**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**

Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in Email : spcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
A++ Accredited by
NAAC(2021)with CGPA 3.52

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४**

फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

जा.क्र.विशेष कक्ष/बिंदूनामावलीशिबीर/२०२१/1494 दिनांक : 25 NOV 2021

## परिपत्रक

प्रति,

**सर्व संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था**

**विषय** — शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीच्या प्राथमिक तपासणीबाबत...

**संदर्भ** — विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र
जा.क्र.विसस/कोवि / सांगली अनु/२०२१—२२/५९५७ दि.२३/११/२०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भित विषयास अनुसरुन आपणांस कळविणेत येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा जा.क्र. संकिर्ण—आढावा—१५१३/प्र.क्रं.१२५/(भाग—८)/मशी—५ दि.१२/११/२०२१ नुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथिल करणेबाबत शासन निर्णय निर्गमित झाला असून, जा.क्र. बीसीसी२०१६/प्र.क्र. २२८ए/१८/१६—ब दि.०९/०९/२०२१ च्या शासन निर्णयानुसार छोटया संवर्गातील मागासवर्गायांकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती विशद करण्यात आल्याने त्याअनुषंगाने झालेला बदल बिंदुनामावलीमध्ये करुन महाविद्यालये/संस्थांनी प्राथमिक बिंदूनामावली तपासणी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे नजिकच्या काळात कार्यक्षेत्रातील तीन्ही जिल्हयात शिबीर आयोजित करणेबाबत कार्यालयाचा मानस आहे. तरी सर्व महाविद्यालयांनी सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्रे तयार करुन ठेवावी. तसेच शिबिरावेळी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहून सहकार्य करावे.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

उपकुलसचिव
विशेष कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोबत :— वरीलप्रमाणे...

Est 1962
"A++ Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## विशेष कक्ष विभाग

बिंदूनामावली प्राथमिक तपासणीसाठी सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी.

१.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांनी अनुदानित महाविद्यालयासाठी दिलेली इ.१/१०/२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय पदमान्यता/संचमान्यता सोबत जोडावी.

२.सन २०१९ मध्ये मावक, पुणे कार्यालयातील अंतिम तपासणी केलेली बिंदूनामावली प्रत जोडावी.

३.शिक्षकांना संस्था/महाविद्यालयाने दिलेला नियुक्ती आदेश, तसेच उभी व आडवी मान्यता पत्र सोबत जोडावे

४. समांतर आरक्षणाची तरतूद शासन व विद्यापीठ नियमानूसार करणेबाबत संस्थेचे हमीपत्र सादर करावे.

५. दि.३१/१२/२०२१ अखेर रिक्तपदे कोणत्या कारणाने पद रिक्त झाले आहे त्याचा तपशील जोडावा (तपशीलासह शिक्षक यादी)

६. शिक्षकांचे हजर निवेदन जोडावे.

७ महाविद्यालयात कार्यरत असणा—या मागासवर्गीय शिक्षकांचे जात प्रमाणपत्र व जातवैद्यता प्रमाणपत्र जोडावे.

८. जन्मतारखेची नोंद असल्याचे प्रमाणपत्र उदा.पॅनकार्ड दहावी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला यापैकी कोणतेही एक कागदपत्र जोडावे. सर्व कागदपत्रे साक्षांकित करून आणावीत.

९. रेकॉर्डमध्ये कोणत्याही प्रकारे खाडाखोड/रि—रायटिंग असता कामा नये.

## संस्था व महाविद्यालयांसाठी छोटया संवर्गासाठीचा विहीत नमुना (२ ते ३२ पदांपर्यंत)

### परिशिष्ट अ

**१)पदाचे नाव:-** **एकूण मंजूर पदे -**

**भरतीचे प्रमाण** - सरळसेवा एकूण मंजूर पदाचे % टक्केवारी नुसार उपलब्ध पदे -

सरळसेवेच्या कोटयातील ---- पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे

दिनांक / / अखेरचा गोषवारा.

| तपशिल | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| आवश्यक पदे | | | | | | | | | | | |
| कार्यरत पदे | | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | | |

**दाखला (सदरचा दाखला प्रत्येक सरळसेवा व पदोन्नतीच्या गोषवाऱ्याखाली असणे आवश्यक आहे.)**

**दाखला** देणेत येतो की,

**१)वरील** गोषवा-यात नमूद केलेप्रमाणे कार्यरत कर्मचारी------ याप्रमाणे असून गोषवा-याव्दारे काढणेत आलेला असून अनुशेष मी स्वत: तपासला असून तो बरोबर आहे.

**२)नामावली** नोंदवहीमध्ये या संवर्गातील कर्मचा-यांच्या नोंदी सेवाजेष्ठतेनुसार घेण्यात आलेल्या असून त्या मी स्वत: तपासून पाहिल्या असून त्या बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतरच मी सत्यतेबाबत स्वाक्षरी केली आहे.

**३)नामावली** नोंदवहीत नोंद असलेल्या-----कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश/वैयक्तीक मान्यता पत्र मी स्वत: तपासले असून ते बरोबर आहेत. सदरचे नियुक्ती आदेश/वैयक्तीक मान्यताप्रत्राच्या मुळ प्रती कार्यालया`ीन दप्तरी जतन करुन ठेवणेत आल्या आहे. त्यामध्ये काही तफावत आढळल्यास हे कार्यालय जबाबदार राहील.

४) नामावली नोंदवहीतील----मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातीचे दाखले व ---जात वैधता प्रमाणपत्र मी स्वत: तपासले असून ते बरोबर आहेत. सदरचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयीन दप्तरी जतन करुन ठेवणेत आले आहेत. त्यामध्ये काही तफावत आढळल्यास हे कार्यालय जबाबदार राहील.

५) नामावली नोंदवही तपासणीचे संदर्भात आम्ही सादर केलेली सर्व माहीती ही अचूक व खरी आहे. माहीती खोटी वा चुकीचे असल्याचे आढळून आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहील.

६) सदर संवर्गातील सर्व पदांना शासनाची/सक्षम अधिका-याची मंजूरी घेतलेली आहे.

७) चालू तारखेचा (सद्यस्थितीची) परिस्थिती पाहून गोषवारा तयार करणेत आला आहे. (फक्त सरळसेवेसाठी लागू)

८) कक्षाने तपासणी केल्यानंतर त्यात अनियमितता आढळल्यास त्या संदर्भात खुलासे सादर करणे व प्रपत्र ड विहीत मुदतीत भरुन देणेत येईल. त्यात विलंब झाल्यास संबंधित कार्यालय प्रमुख / नियुक्ती प्राधिकारी हे दिनांक ५/९/२०१४ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाहीस पात्र ठरतील, ही बाब ज्ञात आहे. त्यानुसार कार्यवाही करणेत येईल.

९) कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्याची नियुक्तीपत्रे, जात वैधता प्रमाणपत्रे व इतर आवश्यक माहिती अचूक असल्या बाबतचा कार्यालय प्रमुख / संस्थाप्रमुख तसेच नियुक्ती प्राधिकारी यांचा दाखला घेऊनच संबंधित कार्यालयाची बिंदूनामावली व रोष्टर पडताळणी करुन देणेत आलेली आहे. कार्यालयाने सादर केलेल्या कर्मचारी विषयक माहितीच्या अचूकतेविषयी व वैधतेविषयक बाबींची संपूर्ण जबाबदारी कार्यालय प्रमुख व नियुक्ती प्राधिकारी यांची राहील, ही बाब ज्ञात असून त्यानुसार दिलेली सर्व माहिती अचूक असल्याची खात्री केली आहे.

**दिनांक: / /**

**संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख**
**यांचे नांव,पदनाम व स्वाक्षरी**

**नियुक्ती प्राधिकारी**
**यांचे नांव, पदनाम व स्वाक्षरी**

१) सरळसेवा भरतीच्या पदा संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :-बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब(ए), दिनांक ०६ जुलै, २०२१ मधील तरतुदीस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व ब नुसार विहित केलेली १०० बिंदूनामावली वापरण्यात यावी.
२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजुर पद संख्येपैकी सरळसेवा कोटयातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.
३) दिनांक ०६/०७/२०२१ च्या शासन निर्णयानुसार आरक्षण निश्चित करताना संवर्गातील सरळसेवा कोटयातील एकुण मंजुर पदसंख्येला (अ.जा.-१३%, अ.ज.७%, विजाअ.३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकुण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी

**१)पदाचे नाव:-** **एकूण मंजूर पदे -**

**भरतीचे प्रमाण** - सरळसेवा एकूण मंजूर पदाचे % टक्केवारी नुसार उपलब्ध पदे -

सरळसेवेच्या कोटयातील ---- पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे

दिनांक / / अखेरचा गोषवारा.

| तपशिल | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| आवश्यक पदे | | | | | | | | | | | |
| कार्यरत पदे | | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | | |

आ) दि. / /२०२१ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

**दिनांक: / /**

**संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख**
**यांचे नांव,पदनाम व स्वाक्षरी**

**नियुक्ती प्राधिकारी**
**यांचे नांव, पदनाम व स्वाक्षरी**

१)पदाचे नाव:-

**भरतीचे प्रमाण** - सरळसेवा एकूण मंजूर पदाचे %
सरळसेवेच्या कोटयातील --- पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे
दिनांक / / अखेरचा गोषवारा.

**एकूण मंजूर पदे -**
टक्केवारी नुसार उपलब्ध पदे -

| तपशिल | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| आवश्यक पदे | | | | | | | | | | | |
| कार्यरत पदे | | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | | |

भरती वर्ष - ३
(दि. / /२०२१ ते ३१/१२/२०२१)

| पहिल्या व दुसऱ्या भरती वर्षातील एकूण भरती केलेली पदे + तिसऱ्या भरती वर्षातील भरावयाची पदे | ईडब्ल्यूएस करिता एकूण भरती करावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे | तिसऱ्या भरती वर्षात ईडब्ल्यूएस वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रकियेअंती ईडब्ल्यूएस वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | पुर्णांकात --- पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील २ वर्षातील ईडब्ल्यूएस चीकार्यरत पदे(१ ल्या भरती वर्षातील+२ ऱ्या भरती वर्षातील कार्यरत पदे)<br>० - ० = ० | ० |

**तिसऱ्याभरती वर्षात ईडब्ल्यूएसकरिता --- पदे उपलब्ध होतील.**

| तपशिल | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| एकूण भरावयाची पदे | | | | | | | | | | | |

**दिनांक: / /**

**संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख**
**यांचे नांव,पदनाम व स्वाक्षरी**

**नियुक्ती प्राधिकारी**
**यांचे नांव, पदनाम व स्वाक्षरी**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथील करणेबाबत..

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक: आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/म.शि.५,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.

दिनांक :- १२ नोव्हेंबर, २०२१

वाचा:- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:एसआरव्ही २०१५/प्र.क्र.२९०/का-१२, दि.१६ जुलै, २०१५

२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि.२५मे, २०१७.

३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आ.पु.क., दि.०९ जून, २०१७.

४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आपुक, दि.२९ जून, २०१७.

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक २३.४.२०१८.

६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्रमांक:आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/म.शि.५, दि. ०३.११.२०१८.

७) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०४ मे, २०२०.

८) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक २३.३.२०२१.

९) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि. २४ जून, २०२१.

प्रस्तावना:-

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या प्राचार्य व शिक्षक/शिक्षकेत्तर पदांपैकी उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिलेली एकूण ४७३८ पदभरतीस संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाच्या सहमतीने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी १६७४ पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त असलेली प्राचार्यांची पदे व प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठी संदर्भ क्रमांक ५ येथील शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली होती. मात्र, वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध आणलेले आहेत. प्राचार्य या संवर्गातील रिक्त पदे भरताना शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याने, दिनांक ०३.५.२०२० पर्यंत रिक्त असलेल्या एकूण ३७० पदांच्या पदभरतीस संदर्भ क्रमांक ८ येथील शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र, दिनांक ०३.५.२०२० नंतर देखील विविध

कारणास्तव प्राचार्य या संवर्गातील पदे रिक्त झालेली आहेत. सदरहू पदे भरल्यामुळे शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडत नसल्याने, प्राचार्य या संवर्गातील या शासन निर्णयाच्या दिनांकास रिक्त असलेली पदे व प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठीची आणि सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील दिनांक ०१.१०.२०२० च्या विद्यार्थीसंख्येच्या आधारे अनुज्ञेय होणारी एकूण २१६३ पदे विचारात घेता, उच्च स्तरिय सचिव समितीने मंजूर केलेल्या ३५८० पदांपैकी भरलेली १४९२ पदे वजा जाता उर्वरित २०८८ पदांच्या पदभरतीस, वित्त विभागाच्या दिनांक ०४.५.२०२० व दिनांक २४.६.२०२१ च्या शासन निर्णयातील अट शिथिल करून, मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णयः-</u>

राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील प्राचार्य या संवर्गातील या शासन निर्णयाच्या दिनांकास विविध कारणास्तव रिक्त असलेली पदे व प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठी तसेच सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील उच्च स्तरिय सचिव समितीने मंजूर केलेल्या ३५८० पदांपैकी भरलेली १४९२ पदे वजा जाता, उर्वरित २०८८ पदांच्या पदभरतीस, वित्त विभागाच्या दिनांक ०४.५.२०२० व दिनांक २४.६.२०२१ च्या शासन निर्णयातील अट शिथिल करून, खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहेः-

अ) प्रथमतः अतिरिक्त ठरलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना रिक्त पदी तातडीने समायोजित करण्यात यावे. संबंधीत विषयाकरीता सहाय्यक प्राध्यापकाचे पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतरच संबंधीतांना पदभरतीची जाहीरात देता येईल.

आ) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या दिनांकापासून करण्यात यावी. तसेच वेतन सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या प्रथम दिनांकापासून सुरू करण्यात येईल. सदर बाब पदभरतीच्या जाहीरातीमध्ये नमूद करण्यात यावी.

इ) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याच्या अनुषंगाने उच्चस्तरीय सचिव समितीने काही बाबींची पूर्तता करण्याचे निर्देश दिलेले असल्याने, अद्याप आकृतिबंध निश्चित झालेला नाही. त्यामुळे पदभरतीवरील निर्बंध शिथील करुन उपरोक्त प्रमाणे पद भरतीस मान्यता देतांना दिनांक ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत मानून अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. तथापि, आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने, आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. त्याव्यतिरिक्त पदांवरील पदभरती केल्यास अशा उमेदावराच्या वेतनाची जबाबदारी ही संबंधीत संस्थेची असेल.

ई) मान्यता दिलेल्या शिक्षकीय पदांची पदभरती करताना प्रत्येक महाविद्यालयास संबंधित विद्यापीठ/नियामक प्राधिकरणाने दिलेली संलग्नता (Affiliation) अबाधित राहण्यासाठी तसेच महाविद्यालयाचे मूल्यांकन (Accreditation) व पुर्नमूल्यांकन (Reaccreditation) होण्याकरिता आवश्यक असलेली मर्यादा विचारात घेऊनच शिक्षकीय पदांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यानुसारच पदभरती करण्यात यावी.

उ) अकृषि विद्यापीठ संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय पदभरती करताना विद्यापीठ अधिनियमातील विहीत तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच विहीत प्रक्रीयेअंती उमेदवाराच्या निवडीनंतर उमेदावारांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम दिनांकास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

ऊ) याबाबत मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला संचालकांनी शासनास सादर करावा.

२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९१८/२०२१/व्यय-५, दिनांक १८.१०.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१११११३४१०८९७०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

DATTATRAYA RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=DATTATRAYA RAMBHAU KAHAR
Date: 2021.11.15 12:04:37 +05'30'

(द.रा. कहार)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुंख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
६. सर्व मा.विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. मा. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे.
१७. सर्व विभागीय सहसंचलाक, उच्च शिक्षण.
१८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई, महाराष्ट्र/मुंबई १/२.
२०. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
२१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२२. सर्व जिल्हा कोषाधिकारी यांची कार्यालये.
२३. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२४. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. म.शि.५ कार्यासन, निवडनस्ती.

आदिवासी बहुल जिल्हयातील जिल्हास्तरीय गट"क" व गट"ड" मधील पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी बिंदू नामावली विहित करण्याबाबत. तसेच, छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१६/प्र.क्र.२२८ ए/१८/१६-ब**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२१.

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१६/प्र.क्र. ६२४ ए/१८/१६-ब, दि.१६.८.२०१९.
२) शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१६/प्र.क्र. ६२४ ए/१८/१६-ब, दि.२२.८.२०१९.
३) शासन परिपत्रक क्र. बीसीसी २०१६/प्र.क्र.२२८ए/१८/१६-ब, दि.२१.८.२०१९
४) शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१६/प्र.क्र. २२८ ए/१८/१६-ब, दि.२२.८.२०१९.

**शासन निर्णय :**

आदिवासी बहुल जिल्यातील जिल्हास्तरीय गट-"क" व गट-"ड" सवंर्गातील पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१६.८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये बिंदू नामावली विहित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयास संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२२.८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती. सदर स्थगिती या शासन निर्णयान्वये उठविण्यात येत आहे.

२. तसेच, छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२१.८.२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये विहित करण्यात आली होती. सदर परिपत्रकास संदर्भाधीन क्र.४ येथील दि. २२.८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती. सदर स्थगिती या शासन निर्णयान्वये उठविण्यात येत आहे.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५.५.२०२१ रोजी मराठा आरक्षण रद्द केल्यामुळे दि.१६.८.२०२१ च्या शासन निर्णयान्वये तसेच दि.२१.८.२०१९ च्या परिपत्रकान्वये एसईबीसी प्रवर्गासाठी आरक्षित केलेली पदे खुल्या प्रवर्गात दर्शवून बिंदू नामावली तयार करुन तपासून देण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभाग प्रमुखांच्या/नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०९०९१६३६१५९२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2021.09.09 16:38:46 +05'30'

(र. अं. खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. मा.अध्यक्ष, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
५. सर्व मा.विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्यमा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
७. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), महाराष्ट्र राज्य
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१९. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
२१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२३. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२५. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२६. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका

२८. संचालक, समाजकल्याण, पुणे
२९. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
३०. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३१. संचालक, सेवायोजन, मुंबई
३२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
३३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
३४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३६. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३८. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य
३९. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, सागरमाळ कोल्हापूर-४१६००४.
E-mail- sangalianu1@gmail.com
दुरध्वनी क्रं.०२३१-२५३५४५४ फॅक्स क्रं.०२३१-२५३५४५४

जा.क्रं.विससं/कोवि/सांगली अनु./२०२१-२२/ 5957 दि.२३.११.२०२१.

पदभरती-२०२१/तात्काळ/अतितातडीचे/व्हॉटस्अ‍ॅपव्दारे प्रसारित

23 NOV 2021

प्रति,
मा.कार्यवाह/सचिव/ऑनररी सेक्रेटरी/सेक्रेटरी
तथा नियुक्ती प्राधिकारी व प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित महाविदयालये,
कला, वाणिज्य, विज्ञान , विधी व शिक्षणशास्त्र
महाविदयालये, कोल्हापूर , सांगली व सातारा जिल्हा,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविदयालया मधील प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यांवरील निर्बंध शिथिल करणेबाबत..

संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण शा.नि.क्र.संकीर्ण-आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/(भाग-८)/मशि-५ दि.१२.११.२०२१.
२. संचालनालयाकडील पत्र क्रं.पदभ/११२१/प्र.क्रं.१०/मवि-१/१३४३५ दि.१६.११.२०२१.
३. या कार्यालयांचे पत्र क्रं.शिवि.अनु./२०१९-२०/३५५७ दि.२२.०८.२०१९.
४. या कार्यालयांचे परिपत्रक क्रं.अनु.३/२०२१-२२/४६१४दि.१५.०९.२०२१.
५. या कार्यालयांचे पत्र क्रं.सांगली अनु./२०२१-२२/५९५४ दि.२३.११.२०२१.

उपरोक्त विषयांकीतबाबत कळविण्यांत येते की, संदर्भ क्रं.१ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषि विदयापीठांशी संलग्नित अनुदानित महाविदयालयांतील दि.०१.१०.२०१७ रोजीच्या मंजूर पदांच्या संख्येवर प्राचार्य आणि सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यांवरील निर्बंध शिथिल करण्यांबाबतचे आदेश निर्गमित झालेले आहेत आणि त्यानुसार संदर्भ क्रं.०२ च्या मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी देखिल तात्काळ कार्यवाही करण्यांबाबतचे आदेश दिलेले आहेत. तरी संदर्भ क्रं.०१ चा शासन निर्णय सोबत पुढील कार्यवाहीकरीता सोबत पाठविण्यांत येत आहे.

प्रस्तुत पदे भरताना छोटया संवर्गांकरीता असलेल्या बिंदु-नामावली हया विशेष कक्ष, शिवाजी विदयापीठ , कोल्हापूर यांचेकडून प्राथमिक तपासणी तर मा.सहा.आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडून अंतिम तपासणी करून घेण्यांत यावी. याबाबत छोटया संवर्गांना विषयनिहाय आरक्षण सध्या लागू असल्यामुळे त्याबाबतची बिंदू-नामावलीची तयारी आपल्या स्तरावर कशी करावी याबाबत या कार्यालयांचे संदर्भ क्रं.०४ चे परिपत्रक यापूर्वीच निर्गमित करण्यांत आलेले असून अधिक माहितीकरीता सदरहू प्रत पुनःश्च सोबत पाठविण्यांत येत आहे. (टिप- आरक्षणांच्या तरतूदी अल्पसंख्यांक संस्था यांना लागू असणार नाहीत तथापि, अल्पसंख्याक संस्था होताणा शासन निर्णयांतील सर्व अटि व शर्तींची पुर्तता सदरहू संस्थांनी पूर्ण करणे बंधणकारक आहे.) तसेच बिंदू-नामावली तपासणी करताना प्राथमिक तपासणी व अंतिम तपासणी यंत्रणा यांचेकडे दि.०१.१०.२०१७ ची विदयार्थी संख्या आधारभूत मानून केलेली पदमान्यतेची प्रत सादर करून या मंजूर पदावरच आरक्षणाची तपासणी करून घेणे नियुक्ती प्राधिकारी यांचेवर बंधणकारक राहील.

तसेच शासन निर्णयातील तरतूदीनुसार या विभागातील दि.०१.१०.२०२० च्या विदयार्थी संख्येवर आधारीत पदमान्यतेमध्ये सध्या कार्यभार नसलेल्या तसेच अतिरीक्त ठरलेल्या शिक्षकांचे समावेशन झाल्याखेरीज नविन पदभरतीकरीता मान्यता प्रदान करण्यांत येणार नाही याची सर्व नियुक्ती प्राधिकारी यानी नोंद घ्यावी.

तरी उपरोक्त प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक पदांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्याकरीता विहित कागदपत्रांसहीत तसेच अदयावत पीटीआर/परिशिष्ठ १ (मा.धर्मादाय आयुक्तसो यांनी प्रमाणित केलेले) सहीत प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीव्दारे तसेच हार्ड कॉपीची एक प्रतिमध्ये सादर करावा.

(डॉ.हेमंत ना.कठरे)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर

सोबत- वरीलप्रमाणे.

प्रत :-

**१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२. मा.शिक्षण संचालक,(उ.शि),महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**३. मा.कुलसचिव, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर यांना पुढील कार्यवाहीस्तव.**
**४. उपकुलसचिव,विशेष कक्ष, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर**

३ व ४/- यांना निर्देशित करण्यांत येते की, कोल्हापूर सांगली व सातारा जिल्हयातील अशासकीय अनुदानित महाविदयालयांतील दि.०१.१०.२०१७ रोजीची विदयार्थी संख्या आधारभूत मानून केलेल्या पदमान्यतेवर संदर्भ क्रं.०३ व ०४ अन्वये यापूर्वी दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार आणि सामान्य प्रशासन विभाग, १६-ब यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार बिंदु-नामावली (विषयनिहाय आरक्षण) दि.१५.१२.२०२१ अखेर कॅम्पचे नियोजन करून प्राथमिक तपासणी पूर्ण करून देण्यांची कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस वेळोवेळी अवगत करावा.

(डॉ.हेमंत ना.कठरे)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर